महाराष्ट्र जनशक्ती | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १५० वा | दिनांक : १०/०३/२०२५ | वार : सोमवार

## आज महाराष्ट्राचा अर्थसंकल्प



**मुंबई :** उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजनमंत्री अजित पवार हे उद्या सोमवार दि. १० मार्च २०२५ रोजी राज्याचा वर्ष २०२५-२६ चा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. नव्याने सत्तेवर आलेल्या महायुती सरकारचा हा पहिला अर्थसंकल्प असून अर्थमंत्री म्हणून अजित पवार यांचा हा अकरावा अर्थसंकल्प असणार आहे.

अजित पवार हे आर्थिक शिस्तीचे कठोर प्रशासक म्हणून ओळखले जातात. जनमताची नाडी ओळखून अर्थसंकल्पात लोकाभिमुख निर्णय जाहीर करताना राज्याच्या विकासप्रक्रियेला धक्का बसणार नाही, याची काळजी ते घेत असतात. विकासयोजनांना निधी उपलब्ध करुन देण्यात तसेच पायाभूत विकासाची प्रक्रिया गतिमान ठेवण्यात ते सातत्याने यशस्वी ठरले आहेत. कोविडच्या संकटकाळात अनेक राज्यांची अर्थव्यवस्था अडचणीत असताना अजित पवार यांनी महाराष्ट्राची आर्थिक शिस्त बिघडू दिली नव्हती, त्याबद्दल त्यांच्या कार्याचा केंद्रीय पातळीवर गौरव झाला आहे.

शेतकरी, कष्टकरी, महिला, दलित, आदिवासी, विद्यार्थी, युवक हे घटक त्यांच्या अर्थसंकल्पाच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. २०२१ चा अर्थसंकल्प ८ मार्च जागतिक महिला दिनी जाहीर करताना त्यांनी तो राज्यातील महिला शक्तीला समर्पित केला होता. २०२२ चा अर्थसंकल्प स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मृतीदिनी ११ मार्च रोजी सादर केला होता. तो छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग, समर्पण, स्वराज्यनिष्ठेला समर्पित होता. कृषी, उद्योग, दळणवळण, आरोग्य, मनुष्यबळ विकास या पंचसूत्रीवर आधारित अर्थसंकल्पही त्यांनी सादर केला आहे. मागील वर्षीचा निवडणूकपूर्व अर्थसंकल्प सर्वसमावेशक, क्रांतीकारी अर्थसंकल्प होता. महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेवर आणण्यात त्या अर्थसंकल्पातील लोकोपयोगी, लोकप्रिय निर्णयांचा महत्वाचा वाटा होता. उद्या सादर होणाऱ्या अर्थसंकल्पाकडून राज्यातील जनतेला अनेक अपेक्षा असून अजित पवार त्या अपेक्षांवर खरे उतरतील, हा विश्वासही जनतेच्या मनात आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार हे उद्या त्यांचा अकरावा अर्थसंकल्प सादर करतील. त्यानंतर ते श्री. शेषराव वानखेडे यांच्यानंतर (१३ वेळा) दुसरे सर्वाधिक (११) वेळा अर्थसंकल्प सादर करणारे अर्थमंत्री ठरतील. शेषराव वानखेडे यांनी १३ वेळा, अजित पवार यांनी उद्याचा अर्थसंकल्प धरून ११ वेळा, त्यांच्यानंतर सर्वाधिक वेळा अर्थसंकल्प सादर करण्याचा मान श्री. जयंत पाटील (१० वेळा) आणि श्री. सुशीलकुमार शिंदे (९ वेळा) यांना जातो.

## 'खोक्या'च्या अटकेसाठी शिरूर कासार बंद





**बीड :** आम्हाला राहायची भीती वाटते रात्रभर झोप येत नाही. माझ्या वडिलांचे दात पडलेत, माझा पाय फॅक्चर झाला, असे महेश ढाकणे म्हणालेत. सतीश भोसलेने कमीत कमी २०० हरणे मारले आहेत, त्यामुळे त्याची एसआयटी चौकशी व्हायला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. आमच्या जीवाला पुन्हा धोका आहे, ज्या लोकांनी आमच्यावर हल्ला केला. त्या सगळ्यांना लवकरात लवकर अटक व्हावी. सतीश भोसले खड्डे करून काय काय पुरलं आहे याची चौकशी व्हावी. त्यादिवशी सुद्धा तो हरण मारून स्कार्पियो गाडीतून घेऊन गेला आहे, मी माझ्या डोळ्याने बघितल आहे, असा दावाही महेश ढाकणे यांनी केला.यावेळी दिलीप ढाकणे यांनीही माध्यमांशी संवाद साधत मोर्चात सहभागी झालेल्या सगळ्यांचे आभार मानले. आम्हाला एवढे मारले याचा आम्हाला कमी दुःख आहे. हरिण वन्य प्राणी मारल्याचे मला सगळ्यात जास्त दुःख आहे. मी त्यांना आडवा गेलो म्हणून मला एवढे मारले. मानवावर एवढा हल्ला करतात तर मुक्या प्राण्यावर कसा हल्ला करत असतील याचा विचार करा, असे दिलीप ढाकणे म्हणाले.

## फडणवीसांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून दाखवावे- उद्धव ठाकरे





**मुंबई :** शिवसेना उबाठा नेते उद्धव ठाकरे यांनी रविवारी ईशान्य मुंबईत निर्धार शिबीर घेतले. या शिबिरातून त्यांनी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर जोरदार टीका केली. ठाकरे म्हणाले की, भाजप ही फेक नरेटीव्ही आहे. उद्या अर्थसंकल्प सादर होणार आहे. त्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना कर्जमुक्त करून दाखवावे. त्यासोबतच त्यांनी लाडक्या बहिणींना दिलेले २१०० रुपयांचे आश्वासन पूर्ण करावे आणि त्यानंतरच आमची बराबरी करावी.

तसेच, उद्धव ठाकरे यांनी ते प्रयागराजला का गेले नाहीत, या संदर्भात स्पष्टच सांगितले. ते म्हणाले की, आम्ही मोहन भागवत यांचे फॉलोवर आहोत. ते जे करतात ते आम्ही करतो. मोहन भागवत गेले नाही तर मी कसा प्रयागराजला जावू. ते स्वत: जात नाही आणि लोकांना सांगतात.

रविवारी चॅम्पियन ट्रॉफीचा अंतिम सामना भारत आणि न्यूझीलंडमध्ये सुरू आहे. त्याचा संदर्भ घेत त्यांनी विरोधकांची दांडी उडवणार असल्याचे सांगितले. महाराष्ट्रात आपली सत्ता मी आणणार, त्यांना सोडणार नाही. आम्ही जय श्रीराम बोलू, पण भाजपला जय शिवाजी, जय भवानी बोलण्यास भाग पाडू. प्रत्येक जिल्ह्यात शिवाजी महाराजांचे मंदिर उभारणार आहे, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

क्रिकेट सामन्याचा संदर्भ देत उद्धव ठाकरे म्हणाले की, मला स्कोअरची चिंता नाही. विरोधकांची दांडी उडवणार आहे. सामना दुबईत सुरू आहे. टीव्हीवर सामना बघू शकतो. त्यासाठी दुबईत जाण्याची काय गरज? शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे विचार मानणारे सांगणारे लोक दुबईत गेले होते. ते भारत पाक सामना पाहत होते. फोटो काढत होते. पाकिस्तानी खेळाडू शेजारी बसले होते. भाजप नेत्यांचे घराणेशाही वाले जय शहा गेले होते. ती लोक आम्हाला हिंदुत्व शिकवणार आहे का? उद्धव ठाकरे गेले असते किंवा आदित्य ठाकरे दुबईत गेले असते, तर गदारोळ केला असता. मोहन भागवत मशिदीत जातात. उद्धव ठाकरे अजूनही गेले नाही, आम्ही गेल्यावर त्यांनी काय केले असते? असा प्रश्न उद्धव ठाकरे यांनी विचारला.

भाजप देशप्रेमी आहे, हे फेक नेरेटीव्ही आहे. जोपर्यंत पाकिस्तान आपल्या देशासंदर्भात चांगली भूमिका घेत नाही, तोपर्यंत पाकिस्तानसोबत सामना खेळू नये, ही भूमिका शिवसेना प्रमुखांची होती. परंतु ते आता आम्हाला देशप्रेम शिकवत आहे. ज्यांच्या स्वातंत्र्यसंग्रमाशी संबंध नाही, त्यांच्याकडे देशाची सूत्र गेली आहेत. संघावाले गच्चीवर लाठ्या काठ्या घेऊन बसतात. ते लोक आम्हाला हिंदुत्व शिकवतात, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी संघावर केली.

मुस्लिम आमच्यासोबत आले तर यांच्या पोटात काय दुखतंय? लगेच ते व्होट जिहाद म्हणतात. कोरोना काळात केलेल्या कामामुळे मुस्लिम आमच्यासोबत आहेत, असं उद्धव ठाकरे म्हणाले. ते म्हणाले की, इतकी वर्षे आपण यांना डोक्यावर घेऊन दिल्ली दाखवली, त्यांनी सत्ता मिळाल्यानंतर लगेच खरं रुप दाखवलं. २०१४ साली सत्ता आल्यानंतर त्यांनी लगेच युती तोडली. त्यावेळी आम्ही हिंदू नव्हतो का?

निवडणूक आयोगाने आपल्यावर अन्याय केला आहे. सर्वोच्च न्यायालयात पक्षाचा निकाल लागत नाही. आता हातात काही नाही, मी काही देऊ शकत नाही. पण तरीही तुम्ही माझ्यासोबत आहात. त्यामुळेच अभिमानाने पुढे जाऊ शकतो असे उद्धव ठाकरे म्हणाले.

ठाकरे म्हणाले- लोकसभेनंतर आम्ही गाफील राहिलो. आपण केलेले काम हे विधानसभा निवडणुकीमध्ये जागेच्या साठमारीमध्ये घालवलं, ते लोकांना सांगू शकलो नाही अशी खंत मित्रपक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केली.

उद्धव ठाकरे म्हणाले की, ही लढाई पक्षाची नाही, राजकीय नाही तर मातृभाषेची, महाराष्ट्र धर्माची आहे. सर्व भेद गाडून मराठी माणसांची एकजूट करा. मुंबई महापालिकेची निवडणूक कधीही लागो, तुम्ही तयार राहा. निवडणुकीमध्ये बंडखोरी नको. ही लढाई आईच्या अस्तित्वाची आहे, तिच्याशी गद्दारी करू नका. आज जसा तुम्ही लढण्याचा निर्धार केला, तसा निवडणुकीतही विजयाचा निर्धार करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० मार्च २०२५


## अंजना स्कूल ऑफ एक्सलेंस येथे जागतिक महिला दिनी कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला




**छत्रपती संभाजीनगर (शिवाजी गायकवाड) :** आसेगाव येथिल अंजना प्रतिष्ठानच्या सौं. स्मिता पल्हाळ, यांच्या संकल्पनेतून आठ मार्च जागतिक महिलां दिनी खेळ पैठणीचा होम मिनिस्टर महिलांसाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.तसेच पैठणी साडी, चांदीचे नाने, सौभाग्यवती लेणं नथ अशा वस्तू महिलांनी कार्यक्रमात जिंकल्या व सत्तर कार्य कर्तृत्ववान महिलां आणि महिला सरपंच यांचा सन्मान करण्यात आला.शनिवारी हा कार्यक्रम आसेगाव तळेसमान येथिल अंजना शाळेत संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून शासकीय वैध्यकीय महाविद्यालयांच्या माजी अधिष्ठाता स्त्री, बालरोग तज्ञ राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. कानन येळीकर, माजी प्राचार्य डॉ. सी एस पाटील, गंगापूर तालुकाक्रीडा अधिकारी लता लोंढे, सौं. मोनिका पल्हाळ, सरपंच सविता दिपक राजगुरू, संस्थापक शंकर पल्हाळ,स्वर्णजित पल्हाळ, उद्योजीका दिव्या मराठे आदिंची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे खास वैशिष्ट्ये म्हणजे मराठवाड्यातील ग्रामीण भागात करण्यात येत असलेल्या शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदाना बद्दल अंजना प्रतिष्ठानचा भारत सरकार च्या विज्ञान व औदयोगिक राष्ट्रीय तंत्रज्ञान मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय स्तरावर संशोधक संस्थेचे आंतरराष्ट्रीय शास्त्रज्ञ डॉ.रवी मोरो आणि श्री राजेंद्र येंगडे यांच्या हस्ते राष्ट्रीय सन्मान केला गेला.

तसेच महाराष्ट्रात प्रसिद्ध झालेला " चांडाळ चौकडीच्या करामती" फेम मराठी अभिनेते रामभाऊ जगताप यांनी होम मिनिस्टर खेळ पैठणी चा मनोरंजनपर कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमात पडेगाव, तारणगण, देवगिरी, मिटमिटा, शरणापूर, माळीवाडा, दौलताबाद, आंबेगाव, फतियाबाद, आसेगाव येथील महिलां मोठया संख्येने उपस्थित होत्या. या कार्यक्रमात परिसरातील निवड समितीने निवड केलेल्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मान प्रमुख मान्यवारांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंजना स्कूल ऑफ एक्सेलेंस च्या प्राचार्या स्नेहा पवार व इतिहास अभ्यासक प्रा. डॉ.शिवाजी गायकवाड यांनी केले. शाळा व्यवस्थापन चे देव साठे, आकाश इंगळे,शिक्षिका, कर्मचारी,शिपाई बस चालक आदींनी मोठे परिश्रम घेत कार्यक्रम यशस्वी केला.

## महिलांच्या हस्ते राज्य पुष्प जारूळ वृक्षाचे रोपण, संगोपनाची दोरी ही सांभाळली



**कन्नड (अरुण थोरात):** वृक्षारोपण व संवर्धन कार्यात महिलांचा सहभाग असावा, हरीत महाराष्ट्र घडवण्यात त्यांचे योगदान लाभावे या हेतूने कीर्ती जमदाडे- कोकाटे, विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरन विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली सिल्लोड येथील अभिनव प्रतिष्ठानचे वृक्ष संवर्धक व राज्यपुष्पाचे राज्यभर रोपण करण्याचे अभियान राबविणणारे डॉ. संतोष पाटील व सामाजिक वनी करन विभागाचे वन परीक्षेत्र अधिकारी शेषराव तांबे यांच्या सहयोगाने महिला दिनाच्या निमित्ताने आज शहरातील विविध ठिकाणी राज्यपुष्प जारूळचे रोपण करण्यात आले. जारूळच्या फुलास "क्वीन्स फ्लॉवर" म्हणजेच राणीचे फुलं असे ही म्हटले जाते व ते आपल्या राज्याचे हरीत मानचिन्ह ही आहे.

समाजातील विविध स्तरावरील महिलांना वृक्षारोपणाचा बहुमान मिळावा या भावनेने यशवंतराव चव्हाण महाविद्यालच्या प्रा.डॉ. रुपाली पालोदकर, प्रा.डॉ.सुनीता सावदेकर, छ. शिवाजीनगर येथील माँ दुर्गा देवी महिला मंडळा च्या सर्व सदस्या, वनरक्षक पूजा परदेशी, आदींच्या हस्ते रोपण शहर व तालुक्यात विविध 10ठिकाणी रोपण करण्यात आले.

सिल्लोडच्या भगिनींचे कार्य राज्यास प्रेरणादायी - जारूळ - तामन या राज्य पुष्प रोपणाचे कार्य मोठ्या प्रमाणात सिल्लोड तालुक्यातील अनेक शाळा व विविध ठिकाणी रोपण झाले आहे. जैवविविधता संवर्धन हेतू हे कार्य हरीत महाराष्ट्र करण्यास प्रेरणादायी आहे.

## तिसगाव शासकीय आश्रम शाळेत महिला दिन उत्साहात साजरा



**कन्नड (अरुण थोरात):** जागतिक महिला दिन शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तिसगाव ता. खुलताबाद येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारतात मुंबई येथे पहिला महिला दिन दि. ८ मार्च १९४३ रोजी साजरा करण्यात आला. ८ मार्च १९७१ ला पुण्यात एक मोठा मोर्चा काढण्यात आला होता. पुढे १९७५ हे वर्ष युनोने `जागतिक महिला वर्ष' म्हणून जाहीर केले.

त्यानंतर स्त्रियांच्या समस्या ठळकपणे समाजासमोर येत गेल्या. स्त्रियांच्या संघटनांना बळकटी आली. बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक परिस्थितीनुसार काही प्रश्नांचे स्वरूप बदलत गेले तशा स्त्री संघटनांच्या मागण्याही बदलत गेल्या. आता बँका,कार्यालयांमधूनही दि. ८ मार्च साजरा होत आहे. आजच्या काळात जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा करताना दिसून येतो. त्याचप्रमाणे आज शासकीय माध्यमिक आश्रम शाळा तिसगाव शाळेत जागतिक महिला दिन नियोजित केला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्रीमती खेडकर /वारे, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित श्रीमती जोशी व आवर्जून उपस्थित असलेले शाळेचे मुख्याध्यापक श्री कटारे व सुत्रसंचलन श्री सोनकांबळे यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त श्री कटारे, श्री खालापुरे, श्रीमती खेडकर/वारे, श्री ठाकुर व विद्यार्थ्यांना , विद्यार्थीनींना जागतिक महिला दिनाचे महत्त्व, महिलांचे अधिकार, हक्क, अत्याचार व विविध मुद्द्यांवर भाषण केले. त्याचबरोबर शाळेतील सर्व महिलांना, विद्यार्थीनींना महिला दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. तसेच श्री डोंगरे, श्री कांबळे, श्रीमती माळी ,उमेश राठोड, श्री गावंडे, वैभव दादा, शाळेतील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

## जिल्हा शिक्षक सेनेच्या जिल्हा सचिव पदी अमृतराव सोमवंशी यांची निवड



**छत्रपती संभाजीरनगर :** जिल्हा शिक्षक सेनेच्या जिल्हा सचिव पदी अमृतराव सोमवंशी यांची निवड झाल्याबद्दल जि प प्राथमीक शाळा रेल येथे मुख्याध्यापक प्रवीण शिंदे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आलाअमृत सोमवंशी हे शिक्षकांच्या कामासाठी सदैव तत्पर असतात संपूर्ण संभाजीनगर जिल्ह्यामध्ये शिक्षक सेनेची बांधणी करण्याचे काम ते करत आहेत शिक्षकांची कुठल्याही प्रकारची कामे तडीस नेण्यात त्यांचा हातखंडा आहे. पुढील संघटनात्मक वाटचालीसाठी त्यांना खूप खूप शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शिक्षक सेनेचे तालुका अध्यक्ष दिलीप मगर शाळेच्या सहशिक्षिका वैशाली बोरसे विक्रम गदळे छाया बारगळ आदी उपस्थित होते




# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० मार्च २०२५

## महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत महिला दिन उत्साहात साजरा महानगरपालिका माध्यमिक विद्यालय चिकलठाणा या शाळेमध्ये महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रभाकर शिंदे हे होते व शाळेचे बाल संसदेचे विद्यार्थी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते यामध्ये शाळेतील महिला शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांनी महिला दिनावर भाषण केले काही विद्यार्थ्यांनी जगातील किर्ती मिळवलेल्या महिलांचे पोषक परिधान केले यावेळी शाळेतील इतर शिक्षक सर्जेराव वाघ गणेश पठाडे संदीप चव्हाण वसंत राठोड जाहेद खान पठाण रवींद्र खापे सूर्यवंशी संग्राम सिंग राजपूत या पुरुष शिक्षकांनी महिला दिनाच्या महिला शिक्षिकेला शुभेच्छा दिल्या

# जागतिक महिला दिनानिमित्त हृदय रोग तपासणी शिबिर संपन्न



**कन्नड (अरुण थोरात) :** जाधव नर्सिंग होम कन्नड आणि एस एम बी टी हॉस्पिटल नाशिक यांच्या संयुक्त विद्यमानाने कन्नड शहरात दि.०८ मार्च रोजी हृदयरोग तपासणी व छातीची टुडी इको शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कृषीभूषण डॉ. एस. जे. जाधव यांच्या शुभहस्ते या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले.कन्नड तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा मधील राष्ट्रीय बाल आरोग्य अभियान (RBSK)अंतर्गत मुलांची तपासणी करून त्या मुलांची आजच्या शिबिरा मध्ये मोफत टुडे इको व तपासणी करण्यात आली.कन्नड तालुक्यातील ग्रामीण भागातील व शहरी भागातील गरजू रुग्णांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. या रुग्णां वरती योग्य ते तपासणी करून उपचार करण्यात आला तर काही रुग्णांची टू डी इको करण्यात आली. एस एम बी टी हॉस्पिटल चे डॉ. स्नेहल निल यांनी रुग्णाची तपासणी केली. नाशिकहून आलेले त्यांचे सहकारी डॉ वेदांत ठाकूर, डॉ तरुण पटेल, पंकज कोरडकर, अक्षय मगर, अजित मगर यांनी त्यांना सहकार्य केले.या शिबिर मध्ये २६ बालकांची मोफत तपासणी टुडी इको करण्यात आले.या प्रसंगी जाधव डायग्नोस्टिक चे डॉ रविराज जाधव यांच्या डायग्नोस्टिक सेंटर मध्ये मुलांची टू डी इको करण्यात आली. शालेय विद्यार्थ्यांचे मोफत सेवे बद्दल डॉ. रविराज जाधव यांचे ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रवीण पवार यांनी भेट देऊन आभार व्यक्त केले. डॉ सिकंदर कुरेशी वैद्यकीय अधिकारी, डॉ. सुनेरा शेख, ग्रामीण रुग्णालयाच्या प्रमिला राठोड, विश्राम पावरा, अकीला शेख या स्टाफ नर्स उपस्थित होते.या शिबिराच्या यशस्वी करण्यासाठी डॉ. अय्याज उजाडे, डॉ सदाशिव पाटील, डॉ. विलास पाटील, डॉ. उमेश दहेतकर, डॉ उल्हास ऋषी डॉ साजिया पठाण, डॉ सना शेख, सचिन गिरे, विकास खाजेकर, राज ठाकूर, जितेंद्र राठोड यांनी परिश्रम घेतले.

# वेरुळच्या या किरणोत्सवाचे साक्षीदार व्हा - डॉ. पाईकराव



**छत्रपती संभाजीनगर :** वेरुळ म्हटले की कैलास लेणी हे सर्वपरिचित समीकरण आहे, याखेरीस अजून वेरुळ लेण्या, त्यातील शिल्प यांच्या बाबतही आपण परिचित असाल, आज मात्र एका नव्या आणि गेल्या १० वर्षांपासून अभ्यासकांची पावले वेरुळ कडे वळावी, इतिहास अभ्यासकच नाही तर खगोल अभ्यासकांना आपुलकीचा वाटावा असा नवा विषय आम्ही मांडतोय. वेरुळ येथील १० क्रमांकाचे लेणे चैत्यगृह आहे यातील तथागतांचे भव्य शिल्प चेहऱ्यावरील भाव आणि लेणी परिसरातील वातावरण मन:शांती देणारे आहे.

दरवर्षी लेणी क्र १० च्या लेणीत १० मार्च ११ मार्च या दिवशी ४.३० ते ५.१५ च्या दरम्यान चैत्यगृहाच्या समोरील झरोक्यातून सूर्याची किरणे भगवान बुद्धाच्या चेहऱ्यावर येऊन प्रकाशमान होतात ही तेजाची तेजाशी भेट आहे. याचे साक्षीदार आपण होऊ शकाल. हा सोहळा नक्की अनुभवा वेरुळच्या या किरणोत्सवाचे साक्षीदार व्हा. असे आवाहन मुर्ती व शिल्प संशोधन संस्थेचे सचिव डॉ. संजय पाईकराव यांनी केले.

## सुशीलादेवी देशमुख विद्यालयात महिला शिक्षिकांचा सन्मान



**छत्रपती संभाजीनगर :** येथील सुशीलादेवी देशमुख माध्यमिक विद्यालयात आज सर्व महिला शिक्षिकांचा सन्मान करण्यात आला.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बी. जे. पहिलवान यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात राजधर्म विकास प्रबोधिनी संस्थेचे अध्यक्ष श्री. निखील माने हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच श्रीमती एम. व्ही. देसले या प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या.

सर्व प्रथम विद्यालयातील सर्व महिला शिक्षिका व महिला कर्मचारी यांचा गुलाबपुष्प, पेन व शुभेच्छा कार्ड देऊन गौरविण्यात आले. यानंतर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. तर काही विद्यार्थ्यांनी महिलांच्या कर्तृत्वावर कविता सादर केल्या. प्रमुख पाहुणे श्री. निखिल माने व श्रीमती देसले यांच्या भाषणानंतर मु. अ. श्री. पहिलवान यांनी अध्यक्षीय समारोप केला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि. प्रसाद बरुरे व सार्थक काळे यांनी केले तर चि. अथर्व मिराशे याने सर्वांचे आभार मानले. या वेळी विद्यालयाचे सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० मार्च २०२५


## डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला महाविद्यालयात महिला दिनानिमित्त पालक व माहेर मेळावा संपन्न




**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. (सौ.) इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयात शनिवार,दिनांक ८ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयात सकाळी १०:३० वाजता माहेर व पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा ॲड. डॉ. कल्पलता पाटील भारस्वाडकर, प्रमुख अतिथी शारदा मंदिर प्रशालेच्या मुख्यध्यापिका सौ.सविता मुळे आणि महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी ॲड.रंजन कडेठाणकर यांच्या सत्काराचे व व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्या.डॉ.सुनिता बाजपाई, पालक व माहेर मेळावा समिती प्रमुख डॉ पराग चौधरी,विद्यार्थी संसद प्रमुख डॉ.मीनाक्षी देव ,कनिष्ठ महाविद्यालयाच्या पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार यांची उपस्थिती होती.महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनिता बाजपाई यांनी आपल्या प्रास्ताविकेमधून कार्यक्रमाच्या आयोजना मागील आपली भूमिका स्पष्ट केली. जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांचा आज आपण गौरव करीत आहोत हे आपल्या विद्यार्थिनी साठी अतिशय प्रेरणा देणारे आहे .माहेर मेळाव्यामुळे आपापल्या कामात व्यस्त असलेल्या माजी विद्यार्थिनीना आपल्या मैत्रिणींना आणि प्राध्यापकांना भेटण्याची संधी मिळावी, तसेच पालक -पाल्य आणि शिक्षण व्यवस्था यांची सांगड घालता यावी या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.आजच्या या बदलत्या युगात पालकांची भूमिका अधिक आव्हानात्मक झालेली असून, पाल्य व पालक यांच्यामध्ये होणारा संवाद , संबंधातून सुदृढ समाज कसा तयार होईल यावर प्राचार्यांनी भाष्य केले. प्रमुख अतिथी डॉ .सविता मुळे पालक आणि पाल्यांमध्ये सुसंवाद कसा असावा हे विविध उदाहरणाद्वारे सांगितले.

मी ज्या संस्कृतीत काम करते मी त्यासाठी पात्र व्हावं म्हणून मीच सदैव प्रयत्न करीन हे सांगताना त्यांनीसहा भ - कार भाषा ,भोजन ,भक्ती, भूषा,भवन , व भजन याचे महत्व पटवून दिले .ॲड .रंजन कडेठाणकर यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, आजचे स्त्रीचे शस्त्र हे तिचे शिक्षण आहे विविध कोर्सेस विविध कला आत्मसात करून मुलींनी आर्थिक स्वावलंबना बरोबरच समाजाभिमुख होणे गरजेचे आहे .त्या महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी असल्यामुळे त्या म्हणाल्या हे महाविद्यालय विद्यार्थिनींच्या प्रगतीसाठी अनेक उपक्रम राबवत असते. विद्यार्थिनींनी स्वतःचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी या महाविद्यालयात मिळणाऱ्या ज्ञान व संस्काराची शिदोरी घेऊन स्वतःचा विकास करावा असे आव्हान विद्यार्थिनींना केले. अध्यक्षीय समारोप करताना संस्थेच्या अध्यक्षा मा.ॲड. कल्पलता पाटील भारस्वाडकर यांनी-आयुष्यात कृतज्ञ भाव ठेवला पाहिजे असे सांगितले. महिला आणि पुरुष एकमेकांच्या सहकार्यातूनच चांगल्या प्रकारे प्रगती करू शकतात,महिला एका वेळी अनेक जबाबदाऱ्या सक्षमपणे पार पाडत आहेत असे सांगितले.पालकांमधून नारायण नंद यांनी आपल्या मनोगतातून सांगितले की महाविद्यालयात विविध प्रकारचे उपक्रम होतात त्यामुळे माझ्या दोन्ही मुलींचा खुप चांगला व्यक्तिमत्व विकास येथे झाला. या महाविद्यालयाबद्दल आम्हाला विश्वास आहे. त्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. तर माजी विद्यार्थिनींपैकी नेहा सोनवणे यांनी यानिमित्ताने पुन्हा महाविद्यालयात येता आल्याचा आनंद व्यक्त केला. मी अतिशय ग्रामीण भागातून आलेली आत्मविश्वास नसलेली मुलगी होते .या महाविद्यालयाने मला आत्मविश्वास दिला .आज मी एका चांगल्या कंपनीमध्ये मोठ्या पोस्टवर काम करीत आहे .त्याबरोबरच या महाविद्यालयाने दिलेल्या संस्कारामुळे आज माझी भाषा लेखन समृद्ध असल्याचे तिने सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुषमा देशपांडे यांनी केले तर आभार प्रगटन डॉ. पराग चौधरी यांनी केलेया कार्यक्रमाला माजी विद्यार्थिनी, पालक ,प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अजितदादा तुमच्या आमदारामुळे राज्य नासतय - वैभवी देशमुख



**बारामती :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आज बारामतीमध्ये सर्वधर्मीय मोर्चा काढण्यात आला. मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने या मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अजित पवार यांच्याकडे न्यायाची मागणी करतात संतोष देशमुखांची मुलगी वैभवीला अश्रू अनावर झाले. अजितदादा, तुमच्या आमदारामुळे राज्य नासत चालले आहे, त्याला पाठीशी घालू नका, आम्हाला न्याय द्या अशी मागणी वैभवी देशमुखने उपमुख्यमंत्री अजित पवारांकडे केली. जर न्याय मिळाला नाही तर रस्त्याने चालताना धक्का लागला तरी हे आम्हाला जीवे मारतील, अशी भीतीही तिने व्यक्त केली.

सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी हत्या करण्यात आली. या प्रकरणी ८ आरोपींना अटक करण्यात आली असून सर्वांवर मकोकाअंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. मात्र एक आरोपी अद्यापही फरार आहे. तपासयंत्रणांनी १४०० हून अधिक पानांचे आरोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड हा या हत्येचा मुख्य सूत्रधार असल्याचा दावा आरोपपत्रात करण्यात आला आहे. संतोष देशमुख यांच्या हत्येला आज ३ महिने पूर्ण झाले आहेत. या हत्येच्या निषेधार्थ बारामतीत भव्य मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये देशमुख कुटुंबीयही सहभागी झाले होते. यावेळी वैभवी देशमुख यांनी बारामतीकरांसमोर आपल्या भावना मांडल्या. शेवटच्या वेळी बाबांना पाहता आलं नाही याची खंत वैभवी देशमुख यांनी व्यक्त केली.

अजित पवारांना विनंती आहे की, माझे वडील गेलेत आम्ही न्याय मागतोय. आम्हाला लवकरात लवकर न्याय द्या. या प्रकरणाची खोलवर जाऊन चौकशी करा. तुमच्या पक्षातील एक जे आमदार आहेत त्यांच्यामुळे हे राज्य नासत चालले आहे. त्याला तुम्ही पाठीशी घालू नका. त्यांच्यामुळे आमच्यासारख्या सर्वसामान्य लोकांचे जगणे मुश्कील झाले आहे, असे वैभवी देशमुख म्हणाली. अजितदादा हे असे व्यक्तिमत्व आहे की ते खऱ्याचं खरं करतात, खोट्याचे खोटे करतात. या प्रकरणात सुद्धा त्यांनी लवकरात लवकर न्याय मिळवून द्यावा, असेही ती म्हणाली.

एका दलित व्यक्तीला वाचवायला गेले तरी माझ्या वडिलांना अमानुष मारहाण झाली. एखाद्याला मदत करणे गुन्हा आहे का? ज्या खंडणीसाठी माझ्या वडिलांचा जीव गेला ती खंडणी नेमकी कुणाला जात होती? त्यामध्ये माझ्या वडिलांचा गुन्हा काय होता? सरकारचे डोळे कधी उघडणार? असे सवालही वैभवी देशमुखने उपस्थित केले. मला माझ्या वडिलांचा चेहरा बघायचा होता. मला चेहरा बघायला मिळाला नाही. इथून पुढे कधी चेहरा बघायला मिळणार नाही, असेही ती म्हणाली.

बीड जिल्ह्यातील ही घाण आम्हाला उचलून टाकणार आहे. आता आम्हाला जर न्याय मिळाला नाही तर रस्त्याने चालताना धक्का लागला तरी हे आम्हाला जीवे मारतील, अशी भीती वैभवीने व्यक्त केली. त्यामुळे न्याय मिळाला पाहिजे. प्रशासनाने आम्हाला न्याय द्यावा हीच विनंती असल्याचे तिने सांगितले.

## यशासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न करा - रेषा पटेल

**शिरपूर :** विद्यार्थ्यांनी यश मिळवण्यासाठी परिश्रमपूर्वक प्रयत्न करावे. ध्येय निश्चित करून ते गाठण्यासाठी झटावे. तसेच तांत्रिक कौशल्य आत्मसात करावे. संस्कृती, कला, तंत्रज्ञानाचा अभ्यास करावा. ज्ञानाच्या बळावर जीवनातील समस्या सोडवता येऊ शकतात. तसेच दुबळ्यांचा आधार होण्यासाठी प्रयत्न करावे, असे मत शिरपूर एज्युकेशन सोसायटीच्या सचिव रेषा पटेल यांनी व्यक्त केले.

येथील शिरपूर एज्युकेशन सोसायटी संचालित एच. आर. पटेल कला महिला महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण कार्यक्रम झाला. त्या वेळी त्या बोलत होत्या. या वेळी ॲड. शालिनी सोनवणे, माजी नगराध्यक्ष संगीता देवरे, बालाजी सेवा समितीच्या चारू पाटील, दिलीप देवरे, रमेश कुलकर्णी, प्राचार्या डॉ. शारदा शितोळे आदी उपस्थित होते. दिलीप देवरे म्हणाले की, शिक्षकच उत्कृष्ट नागरिक घडवता. त्यामुळे त्यांचा आदर करावा. विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षा, लोकसेवा आयोगाच्या माध्यमातून स्वतःला सिद्ध करावे, असेही ते म्हणाले. ॲड. शालिनी सोनवणे म्हणाल्या की, समाजातील वाईट प्रवृत्तींना ठेचून काढावे. त्याचबरोबर नाही म्हणायला शिकावे असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

### यांचा करण्यात आला सत्कार

कार्यक्रमात विविध क्षेत्रात यश मिळवल्याने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार झाला. त्यात देवयानी रवींद्र सोनार, जयश्री संजय पाटील, नेहा संजय भावसार, आदर्श विद्यार्थिनी जयश्री रोहिदास पाटील, गॅदरिंग क्विन सविता सोनवणे, शेवंता पावरा, काजल चौधरी, प्रतीक्षा पानपाटील, दिव्या मोरे, अश्विनी पवार, अश्विनी भोई, वैशाली पवार, लिना गुरव, अर्पिता ईशी, दीपाली गोपाळ, ज्योती भोई, शीतल राठोड, नंदिनी आखडमल, शेवंता पावरा, विनिता चौधरी, जान्हवी बोरसे, मंजुषा वाणी, दिव्या बाविस्कर यांचा समावेश होता.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० मार्च २०२५


## विद्यार्थी विद्यार्थिनींनी शिक्षण घेऊन वैज्ञानिक दृष्टिकोन अंगी बाळगायला हवा - प्राचार्या डॉ. जयश्रीताई गावित



**पिंपळनेर :** आज जागतिक महिला दिन आहे. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या यशात स्त्रीचा महत्त्वाचा वाटा असतो. मुलींनं खूप शिकलं पाहिजे. चांगलं वागलं पाहिजे की जेणेकरून आई-वडिलांना वाटलं पाहिजे की आम्ही वाघिणीला जन्म दिला आहे. ज्या स्त्रियांनी बाबा, बुवा म्हणजेच अंधश्रद्धेला पूजलं त्या स्त्रिया देशोधडीला लागल्या पण ज्यांनी सावित्रीबाई फुलेंना, जिजाऊंना मानलं त्या पंतप्रधान व राष्ट्रपती झाल्या. शिक्षणामुळे अनेक स्त्रियांचे आयुष्य बदलले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो प्राशन करील तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे ह्या शिक्षणाची कास गाव,पाड्यावरील, वस्तीवरील विद्यार्थ्यांनी धरायला हवी. मुलींना शिकता यावे म्हणून सावित्रीबाई फुलेंनी जीवाचे रान केले. त्यामुळे मुलींनी शिकायला हवे. असे मत वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी लोकनेते माणिकराव गावित कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. जयश्रीताई गावित यांनी व्यक्त केले.

यावेळी विचार मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष धनरासचिव एस.एस. बिरारीस, पिंएसो चे संचालक हिरामण गांगुर्डे, पिंएसोचे संचालक डॉ. विवेकानंद शिंदे, शरद शिंदे, प्राचार्य आर.पी.लोहार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.बी.पवार व स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. डॉ.सतीश मस्के आदी मान्यवर उपस्थित होते. पिंपळनेर येथील कर्म.आ.पाटील कला, वाणिज्य व कै. अण्णासाहेब एन.के.पाटील विज्ञान वरिष्ठ महाविद्यालय पिंपळनेर येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी बोलताना प्राचार्या डॉ. जयश्रीताई गावित म्हणाल्या की, मुलींनी आपल्या जीवनामध्ये शिक्षण घेऊन प्रगतीची कास धरायला हवी. आज स्त्रिया नानाविध क्षेत्रामध्ये आपलं स्वतःचं एक अस्तित्व निर्माण करताना दिसत आहेत. त्यामुळे आजच्या विद्यार्थिनींनी ही सर्वांगीण आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास शिक्षणाच्या माध्यमातून करायला हवा. या वेळी प्रमख अतिथी प्रा. संदीप जगताप म्हणाले की, हल्लीच्या या युगामध्ये संस्कृतीची नासधूस होताना दिसते आहे. अनेक जण अंधश्रद्धेच्या नादी लागून स्वतःचे आयुष्य बरबाद करून घेत आहेत. वैज्ञानिक दृष्टिकोनापासून अलिप्त राहताना दिसत आहेत. हल्ली जाते धर्माचे प्राबल्य वाढत चालले आहे. त्यामध्ये माणूस अडकून जाऊन स्वतःचे जीवन उध्वस्त करून घेत आहे. विद्यार्थ्यांनी हे साऱ्या गोष्टी लक्षात घेऊन अंगी वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगायला हवा. तुम्हाला जर पिकलेलं विकता आलं तरच खऱ्या अर्थाने तुमचा देश महासत्ता होईल. भारतातील लोक विविध देशात कामाच्या निमित्ताने पोहोचले आहेत परंतु भारत देशात इतर देशातील लोक कामाच्या निमित्ताने आले नाहीत हेही विद्यार्थ्यांनी ओळखायला हवे. अशा अनेक विविध बारीक-सारीक किस्स्यामधून त्यांनी फुले, शिवाजी महाराज, संभाजी महाराज, संत तुकाराम आदींचे दाखले देऊन विद्यार्थ्यांनी जीवनात कसे वागावे आणि कसे राहावे हे अत्यंत सुंदर पद्धतीने सांगितले. त्यामुळे विद्यार्थीही मंत्रमुग्ध झाले. यावेळी अध्यक्षीय समारोप करताना धनराज जैन म्हणाले की , शिक्षणाने माणूस सुसंस्कृत होतो. आपल्या अंगातील कलागुण दाखवून विद्यार्थ्याने स्वतःची प्रगती करायला हवी. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विद्यार्थी घडण्यास मदत होते. श्री संमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ.एल.बी. पवार यांनी केले. स्नेहसंमेलना निमित्ताचा वार्षिक अहवालाचे वाचन स्नेहसंमेलन प्रमुख प्रा. डॉ. सतीश मस्के यांनी केले. या कार्यक्रमांमध्ये गुणवंत प्राध्यापक म्हणून पीएच्.डी मिळवलेले डॉ . शुभम गौड, डॉ. श्रुती गौड व प्रा. धर्मेंद्र बागुल यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता जिजाऊ व बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. पारितोषिक वितरण समारंभा नंतरही सांस्कृतिक विभागाचे प्रा.के.एन. वसावे यांनी काही निवडक विद्यार्थ्यांचे आदिवासी नृत्य व गीत सादर करून प्रमुख मान्यवरांना व विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. आयेशा शेख या विद्यार्थिनींनी ओ मेरी मा हे सुंदर गीत सादर केले. अॅकॅडमी जनरल चॅम्पियन म्हणून चेतना प्रवीण निकुम व जिमखाना जनरल चॅम्पियन म्हणून भवरे राहुल संजय व हर्षदा शरद अहिरराव यांना सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयक्युएसी चे समन्वयक प्रा. डॉ. संजय खोडके व प्रा.सी.एन. घरटे यांनी केले. आभार प्रा. डॉ. वाय.एम. नांद्रे यांनी मानले. कार्यक्रमाला प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य केले.

ज जैन प्रमुख अतिथी म्हणून नाशिक येथील प्रसिद्ध कवी व व्याख्याते प्रा. संदीप जगताप , पिंएसोचे

## शरणापूर येथे महिला दिन साजरा



**पडेगाव (शिवाजी गायवाकड) :** येथून जवळच असलेल्या शरणापूर येथे सरपंच सौ संध्या संदिप आप्पा सदावर्ते यांच्या अध्यक्षतेखाली आठ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन अंगणवाडी सेविका पुष्पा सिरसाठ, सावित्रीबाई निळे, मंदा पुरे,आशा वर्कर पद्मा खजिनदार, सी आर पी सविता हिवर्डे, उपजीविका सखी मुक्ता खजिनदार व बचत गटातील महिला गावातील महिला जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका आणि कर्तृत्ववान महिलांचा व ग्रामपंचायत सदस्य मुक्ता भवर, उज्वला टोटवड यांचा पुष्प गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी ग्रामविकास अधिकारी सरांगधार लोडे व ग्रामपंचायत लिपिक राजेंद्र साठे आणि इतर कर्मचारी उपस्थित होते.

## महिला दिना निमित्त घाटशेंद्रा येथे महिलांचा सत्कार




**कन्नड (अरुण थोरात):** ग्रामपंचायत व कला महाविद्यालय चिंचोली यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाच्या औचित्य साधून सन्मान लेकीचा या संकल्पने आधारित घाटशेंद्रा गावातील उच्चशिक्षित व वेगवेगळ्या क्षेत्रात नोकरी व्यवसाय करणाऱ्या मुलींचा महिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील महिलांनी भरभरून प्रतिसाद दिला. या कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून पुणेरी उद्योग समूहाच्या संचालिका श्रद्धा शिंदे, सिल्लोड च्या माजी नगराध्यक्षा राजश्रीताई निकम, राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या सरपंच सविताताई निकम, वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या जवळपास सर्व महिला उपस्थित होत्या.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्या सर्व महिला पुरुषांनी परिश्रम घेतले, सर्वांचे ग्रामपंचायत च्या माध्यमातून आभार व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी प्रा. प्रतिभा साबळे, प्रा. डॉ. वंदना बनकर, उत्कृष्ट सूत्रसंचालक संतोष भुसारे, वंदूताई देशमुख, श्रीमती मनीषा, राजू शेठ कथार, पिशोर पोलीस स्टेशनचे एपीआय शिवाजीराव नागवे, घाटशेंद्रा चे सरपंच लक्ष्मण मामा गवळी, प्रा. समाधान गायकवाड, मा. पंचायत समिती सदस्य तथा उपसरपंच, बाळकृष्ण गायकवाड ग्रामविकास अधिकारी घाटशेंद्रा, सह समस्त ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी ग्रामस्थ उपस्थित होते.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १० मार्च २०२५

# सामान्य माणसाच्या चिवट जीवन संघर्षाचा चढता आलेख "झामाई": विद्रोही कवी साहेबराव मोरे



राजाराम जाधव यांनी "झामाई" काव्यसंग्रह समीक्षणासाठी पोस्टाने साभार पोहोच केला.बंजारा समाजातील संवेदनशील लेखक, कवी, कार्यकर्ता म्हणून ते ओळखले जातात .मराठीतल्या बोलीभाषेतील कवितेचा आई हा विषय अग्रणी राहिला आहे, आई शब्दाची किमया अनेक प्रतिभावंतांनी शब्दात उतरविण्याचा प्रयत्न केला आहे.मौखिक व लिखित स्वरूपातील प्रातिनिधिक काव्यसंपदा ग्रंथरुपी उपलब्ध आहे राजाराम जाधव हा मातृत्व जपणारा समर्पक मुलगा या अनुषंगाने त्यांनी आई-याडी " झामी"स झामाई हा काव्यसंग्रह समर्पित केला आहे, आईचे मातृऋण फेडण्यासाठी त्यांनी हा संग्रह प्रकाशित केला आहे,आई विषयावरील मोजक्याच परंतु आंतरिक उमाळ्यातून आलेल्या कविता वाचून आईप्रति असणारे प्रेम अंकीत झालेले लक्षात येते आई अंतरीचा मृदूभाव असते हा भाव' वेदना 'कवितेतून व्यक्त होताना कवी भावूक झाला आहे "खंत वाटे मला आजही याडी-आई सोडून गेल्याचीहीच वेदना मनात वसते,हृदयाच्या कप्प्यात कायमची"आई महती वर्णन करणारी परंपरागत ओवी मुद्दामहून उद्धृत करीताहे,"माय माय करू माय सोनानी पालखी मायनाबिगर कोण करेना आलोखी"संग्रहात विविध विषयांवरील 52कविता असून जाधवांनी, शेती, वृक्षवल्ली, निसर्ग, मायलेक, नातीगोती, कुटुंब कबिला, सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक प्रश्न, जीवनमूल्ये, आयुष्यातील चढउतार अशा वैविध्यपूर्ण आशयावर लेखन केले आहे, मंत्रालयात सहसचिव असतांना गाव,तांडे, शहरंरात भेटलेल्या माणसांच्या व्यथा वेदनांवर ते सदोदित फुंकर घालत मदत करीत त्यामुळे अस्तित्ववादी जाणीवा प्रगल्भपणे मांडलेल्या प्रकर्षाने जाणवतात ."वेदना कालची"कवितेतून विद्यमान सामाजिक वास्तव अधोरेखित केले आहे,"जगरहाटी अशीच आहे,टोमणे खुन्नस ठेवण्याची.वज्राघात जरी केले त्यांनीवेळ त्यांनाच शुभेच्छा देण्याची"शेतकर्यांच्या कष्टप्रद हलाखीच्या परिस्थितीचे दारुण वर्णन करताना ते लिहितात,"अंगी घालायला ना धडकाघर झालया पडकामाह्या संसार फाटका आता मोजता घटका(जगाचा पोशिंदा)ग्रामीण भागातील बोलीचा साज चढवून ल्यालेली नादमधुरता, गेयतावर्धी यमक ही त्यांच्या लेखनाची खासियत .उसवत चाललेल्या नाजूक नात्यांतील स्नेह बंधाविषयी कवी जाधव एकोपा चे आवाहन करताना कौटुंबिक जिव्हाळा, आपुलकी प्रेमभाव जीवंत रहावा हा आशावाद व्यक्त करतात ."कुटुंबात आपल्या आहे कांथोडी शांती,थोडा एकोपा आधी आपण हे तपासाहेवेदावे सोडून नाती मात्र जपा"झामाईतल्या निसर्ग कविता चित्तवेधक असून उत्साह निर्माण करणार्या आहेत , तसेच कवीच्या प्रतिभेची साक्ष देतात.जलधारा, श्रावण सरी,बरस रे पावसा,घन आदी कविता या अनुषंगाने दखलपात्र ठरतात 'जलधारा' कवितेतील पंक्ती मन उल्हासित करतात "बरसली जलधारा सुखी झाली अख्खी धरामन थुईथुई नाचेमाझ्या कानी सांगे वारा"अतिशय साध्या भाषेतून आलेल्या कविता लयबद्ध ,आशयघन आहेत हे एक वैशिष्ट्य नमुद करावेसे वाटते परिवर्तन विचारांचा प्रभाव काव्यसंग्रहात नजरेत भरतो क्रांतिबा फुले, वसंतराव नाईक, सावित्रीज्योती यांच्या वैचारिक क्रांतीची बीजे उजागर करणारी कविता कवीची पुरोगामीत्वाची 'जातकुळी सिद्ध करतेकिर्ती महानायकाची, 'विमुक्त,'भिडेवाडा बोलला' ह्या पुष्ट्यर्थ उपरोक्त कविता लक्षवेधी ठरतात 'आयुष्याच्या वाटेवर 'कवी जळजळीत वास्तव समोर आणतो,"पाणवठे नात्याचे उभारले ज्यांनी -त्यांनी जागोजागी नकळत ते खेळतातधुर्त चाल ऐन निवडणुकीच्या मध्यभागी"राजकारण कमालीचे भ्रष्ट झालेआहे.सत्तासंपादन हा एकमेव उद्देश पुढार्यांच्या अनैतिकतेची, अन्यायाची परिसिमा गाठत आहे,हे ज्वलंत चित्रण कवीच्या प्रशासकीय दौऱ्यादरम्यानच्या व्यापक अनुभवातून आले आहे, आयुष्याच्या वाटेवर काचा पसरवून ठेवणार्या व्यवस्थेकडून न्याय कसा मिळणार? हा टोकदार प्रश्न समाजमन ढवळून काढणारा आहे. प्रशासनकाळातील विदारक अनुभवाचा उपयोग त्यांनी लेखनासाठी केला. सामाजिक उत्तरदायित्व स्विकारून समाजघटकातील वंचिताना लाभ मिळवून दिला, त्यांचे सहा विविध प्रकारातील साहित्य ग्रंथ प्रकाशित झाले आहेत. गोरमाटी बंजारा समाजात राजाराम जाधव यांनी एक आगळा वेगळा ठसा उमटवला आहे झामाई म्हणजे सामान्य माणसाच्या जीवन संघर्षाचा चढता आलेख.सदर काव्यसंग्रहाला याडीकार पंजाबराव चव्हाण यांची सखोल, विस्तृत व व्यासंगी प्रस्तावना आहे.साहित्य म्हणजे मानवी जीवनावरचं भाष्य ,हे कवी जाधव यांच्या काव्यसंग्रहातून प्रतीत होते हे सांगून वाचकांना प्रेरित केले आहे.निलंबवार ग्राफिक्सने मुखपृष्ठातून अस्सल बंजारा पेहरावातील झामी आई जीवंत केली आहे.पाहता क्षणी मनातलं गुज सांगते आहे अशी अनुभूती देणारी ही उत्कृष्ट कलाकृती आहे."वादळ येतंहाहाकार उडतो मसन वटा करून जातो"वादळ पेलणारे संघर्षमयी व्यक्तीमत्व, सन्मित्र राजाराम जाधव यांच्या साहित्यिक वाटचालीसाठी आभाळभर शुभेच्छा !!!तांडा वस्ती वरच्या भयानक परिस्थितीतीलमाणसाच्या अस्तित्वाची जाणीव करून देणार्या 'झामाई' काव्यसंग्रहाचे अभ्यासक व वाचक स्वागत करतील अशी आशा बाळगतो.

**समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव मोरे**
9404048601
**झामाई : काव्यसंग्रह**
**कवी: राजाराम जाधव प्रकाशन: सुधीर, वर्धा किंमत:₹200/**

# विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे नवे अध्यक्ष प्रा. सुभाष वारे



**पुणे** : समाजात आजही विषमता मोठ्या प्रमाणात पाहायला मिळत आहे. समतेचे वातावरण निर्माण व्हायचे असेल, तर समतेला बंधुतेचा ओलावा मिळाला पाहिजे. अंत:करणातून प्रेमभावाने समानता आली, तर खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात उल्लेखित केलेल्या समतेचा व बंधुतेचा आदर होईल. अशी समता खऱ्या अर्थाने जैविक असते,असे मत 27 व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष व ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा. सुभाष वारे यांनी व्यक्त केले. बंधुभावाच्या भावनेतून समाजातील विषमता दूर करण्यासह संविधानाचे संरक्षण करणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

विश्वबंधुता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचे औंध येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय व काषाय प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 27 व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. वारे यांचा, तर विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रा. भारती जाधव यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

नवी पेठेतील एस. एम. जोशी फाउंडेशनच्या आवारातील संविधान कट्ट्यावर झालेल्या कार्यक्रमावेळी विश्वबंधुता साहित्य परिषदेचे संस्थापक बंधुताचार्य प्रकाश रोकडे, संमेलनाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय ताम्हाणे, काषाय प्रकाशनचे प्रा. चंद्रकांत वानखेडे, परिषदेचे सरचिटणीस प्रा. शंकर आथरे, एस. एम. जोशी फाउंडेशनचे व्यवस्थापक राहुल भोसले, बंधुता प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत रोकडे आदी उपस्थित होते.

बंधुताचार्य प्रकाश रोकडे यांनी विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या व चळवळीच्या प्रवासाविषयी मनोगत मांडले. समाजात आज बंधुतेच्या मूल्याची रुजवण होणे गरजेचे असून, संविधानाला सर्वोच्च मानून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी उभारली पाहिजे. बंधुत्वाचे नाते दृढ झाले, तर समाजातील विषमता दूर होण्यास मदत होईल, असे रोकडे यांनी नमूद केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा आदर करून समाजातील समता, बंधुभाव आणि साहित्याच्या माध्यमातून समाजप्रबोधन व्हावे, असे ते म्हणाले.